मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मावळच्या विकासात खासदार बारणेंचा सिंहाचा वाटा

## मोदी व शिंदे यांच्या डबल इंजिनमुळे महाराष्ट्राच्या प्रगतीचा वेग तिप्पट : नितीन गडकरींचं विधान

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आम्हाला देशात 'शिवशाही' व 'रामराज्य' आणायचे आहे, असे भाजपचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी काल (मंगळवारी) सांगितले. मोदी सरकारने गेल्या दहा वर्षात केलेले काम हा फक्त ट्रेलर होता, खरा चित्रपट तर अजून सुरू व्हायचा आहे, असेही ते म्हणाले.

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे-आरपीआय-रासप-मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी कर्जत तालुक्यात चौक फाटा येथे झालेल्या जाहीर सभेत गडकरी बोलत होते. व्यासपीठावर शिवसेना नेते गजानन कीर्तिकर, रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, खासदार बारणे, ज्येष्ठ नेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी, प्रशांत ठाकूर, महेंद्र थोरवे, माजी आमदार देवेंद्र साटम, सुरेश लाड, ज्येष्ठ नेते अतुल पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष भोईर, रामदास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महादेव पाटील, मनसेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांच्यासह महायुतीच्या सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

नितीन गडकरी म्हणाले की, प्रत्येकाला घर, गावागावात पाणी, शाळा, दवाखाना, रस्ता, वीज, शेतीमालाला भाव व रोजगार हे आमचे उद्दिष्ट आहे. आपल्या देशाला भय, भूक, दहशतवाद व भ्रष्टाचार यापासून मुक्त करायचे आहे. या देशात छत्रपती शिवाजी महाराजांची 'शिवशाही' आणि प्रभू रामचंद्रांचे 'रामराज्य' आणण्यासाठी नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होणे आवश्यक आहे. त्यासाठी मावळच्या मतदारांनी बारणे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून द्यावे.




**'रस्ते विकासामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती'**

मावळ विधानसभा मतदारसंघात जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) विकसित झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. पनवेल ते उरण हा आठ पदरी रस्ता पूर्ण झाला आहे. पागोटे ते चौक हा 4,500 कोटी रुपयांच्या रस्त्याचे काम निवडणुकीनंतर सुरू होईल व पुढील एक-दीड वर्षात पूर्ण होईल. या रस्ते विकासाबरोबरच रस्त्यांच्या कडेला लॉजिस्टिक पार्क व इंडस्ट्रियल हब होतील व त्यातून किमान दहा हजार तरुणांना रोजगार मिळेल. या नोकऱ्यांमध्ये 80 टक्के जागा या स्थानिक भूमिपुत्रांना मिळाव्यात, अशी शासनाची भूमिका राहणार आहे.

कळंबोली जंक्शन येथील वाहतूक समस्येवर प्रभावी उपाययोजना म्हणून बहुमजली उड्डाणपूल बांधण्यात येणार असून सुमारे 1600 कोटी रुपये खर्चून हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रकल्प उभारण्यात येईल. हे कामही निवडणुकीनंतर सुरू होईल, असे त्यांनी सांगितले. सागरमाला प्रकल्पांतर्गत या भागात तब्बल दोन लाख कोटी रुपयांची कामे सुरू आहेत. प्रधानमंत्री सडक योजनेअंतर्गत साडेचार लाख गावांना रस्त्याने जोडण्यात आले आहे. अजून दोन लाख गावांना रस्त्याने जोडण्याचे काम सुरू आहे किंवा व्हायचे आहे, या सरकारने आत्तापर्यंत 50 लाख कोटी रुपयांची विकास कामे केली आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

### 'महाराष्ट्राच्या विकासाला डबल इंजिन'

**» मावळ लोकसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास कामे पुण्यात खासदार बारणे यांचा सिंहाचा वाटा आहे, असे त्यांनी आवर्जून नमूद केले. बारणे हे प्रत्येक कामाचा चिकाटीने पाठपुरावा करतात. त्यामुळे ती सर्व कामे आम्हाला करावी लागतात, असे ते म्हणाले. केंद्रात व राज्यात एकाच विचारांची सरकारे असल्यास विकासाला अधिक गती मिळते. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डबल इंजिनमुळे महाराष्ट्राच्या विकासाची गती तिपटीने वाढल्याचे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.**

# संजोग वाघेरे यांच्या प्रचारार्थ महाविकास आघाडीचे गुड मॉर्निंग

## पनवेलमध्ये माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली मतदारांना आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघांमध्ये प्रचार शिगेला पोहोचला आहे. विद्यमान खासदारांच्या निष्क्रियपणाबद्दल नाराजीचा सूर हा यत्र तत्र सर्वत्र असा उमटत आहे. आता हवा खासदार नवा! अशी जनभावना मावळ लोकसभा मतदारसंघात उमटत आहे. याचा प्रत्यय मंगळवारी (दि.७) पनवेलमध्ये आला. शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी यांनी मॉर्निंग वॉक करत मतदारांशी संवाद साधला. महाविकास आघाडीचे अधिकृत व लोकप्रिय उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या समोरील मशालीचे बटन दाबून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे विनंती यावेळी मतदारांना केली.




मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये १८९ पनवेल विधानसभा क्षेत्र निर्णायक समजले जाते. या ठिकाणी सत्ता सोपानावर झुलणाऱ्यांनी जनतेला गृहीत धरले आहे. जनसामान्यांसाठी जीवनावश्यक सेवासुविधा पुरवताना प्रशासनाला दमछाक होत आहे. लोकप्रतिनिधींचा कुठलाही स्वरूपाचा अंकुश प्रशासनावर नाही. विनंती, अर्ज, कामे, समस्या घेऊन गेलेल्या नागरिकांना विद्यमान खासदारांनी हे काम माझ्या अखात्यारित येत नाही, असे सांगत टोलावले आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मंगळवारी प्रचारासाठी एक अनोखी क्लृप्ती वापरली. सकाळी लवकर उठून चालायला येणाऱ्या मतदारांशी संवाद साधताना महाविकास आघाडीच्या नेत्यांना सुंदर प्रतिसाद मिळाला. संजोग वाघेरे पाटील यांच्या रूपाने नवा खासदार आणि जनतेची काम करणारा खासदार आम्हाला मिळेल, अशी नभावना येथे उमटून आली.

# पुणे पालिकेकडून मिळकतींची तपासणी

## भाडेकरू आढळून आल्यास 40 टक्के सवलत नाकारली जाणार : करआकारणी विभागाकडून सर्वेक्षण सुरू




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिका हद्दीतील ज्या मिळकतदारांनी त्यांच्या मिळकतीमध्ये भाडेकरू ठेवले असतील, त्यांनी मिळकतकरात दिली जाणारी ४० टक्के सवलत नाकारली जाणार आहे. त्या अनुषंगाने महापालिकेच्या कर आकारणी विभागाने मिळकतींचे सर्वेक्षण सुरू केले आहे.

महापालिकेने हद्दीतील मिळकतदारांना ४० टक्के सवलत मिळण्यासाठी नागरिकांना ते स्वतः राहात असलेल्या मिळकतीचे पुरावे व 'पीटी ३' अर्ज भरण्यास सांगितले होते. त्यानुसार मिळकतींचे सर्वेक्षण करून संबंधित मिळकतीत स्वत: मालक राहात असल्यास सवलत दिली जाणार आहे. जर मिळकतीत भाडेकरू ठेवण्यात आले असतील संबंधित मिळकतदाराला नियमानुसार कर भरावा लागणार आहे. करआकारणी विभागाने पहिल्या टप्प्यात वडगाव धायरी, वडगाव बुद्रुक व हिंगणे या भागातील मिळकतींची पाहणी प्रायोगिक तत्त्वावर सोमवारपासून (दि.६) सुरू केली आहे.

महापालिकेने हद्दीतील मिळकतदारांना ही सवलत मिळण्यासाठी नागरिकांना ते स्वतः राहात असलेल्या मिळकतीचे पुरावे व 'पीटी ३' अर्ज भरून जवळच्या क्षेत्रीय कार्यालयासह मुख्य कार्यालय, नागरी सुविधा केंद्र किंवा पेठ निरीक्षक, विभागीय निरीक्षकांकडे २५ रुपये शुल्क भरून जमा करण्यास सांगण्यात आले होते. त्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली. अर्जात भरलेल्या माहितीची आणि सादर केलेल्या कागदपत्रानुसार तपासणी करण्यात येत आहे.

सोमवारी ११०० मिळकतींची तपासणी करण्यात आली. या तपासणीसाठी ५ विभागीय निरीक्षक, १० पेठ निरीक्षकांचे पथक तयार करण्यात आले असून प्रशासन अधिकारी रवींद्र धावारे हे पथक प्रमुख म्हणून काम पाहात आहेत. मिळकतधारक स्वतः राहात असल्यास त्यांच्याकडून ४० टक्के सवलतीचा 'पीटी ३' अर्ज नागरिकांना हस्तांतरित करण्यात येत आहे, अशी माहिती कर आकारणी विभागाचे प्रमुख माधव जगताप यांनी दिली.

राज्य सरकारने पुणेकरांना लागू असलेली १९७० पासूनची मिळकतकराची ४० टक्के सवलत काढून घेण्याचा निर्णय घेतला होता. पहिल्या टप्प्यात ज्या नागरिकांचे दोन फ्लॅट आहेत किंवा भाडेकरू ठेवले आहेत, अशा ९७ हजार मिळकतींचा समावेश करण्यात आला. त्यांना २०१९ ते २०२२ या तीन वर्षांतली ४० टक्के सवलतीची रक्कम फरकासह भरण्याचा आदेश देण्यात आला. त्यानुसार महापालिकेने आवाहन केल्याप्रमाणे नागरिकांनी 'पीटी ३' अर्ज दाखल केला होता. आता या अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची तसेच स्वत: मालकच राहात आहे का याची पाहणी केली जात आहे.

महापालिकेला प्रामुख्याने मिळकतकरात अधिक उत्पन्न प्राप्त होते. त्यामुळे महापालिकेकडून कडक कर आकारणी मोहीम राबविण्यात येत आहे. शहरातील अनेक मिळकतदारांनी कर भरण्यासाठी वेळोवेळी महापालिकेकडून आवाहन करण्यात येत आहे.

# बारामती मतदारसंघात मतदान संपताच गोळीबार!

## रामनगरमध्ये दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी हवेत गोळीबार : घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण



**पुणे | प्रतिनिधी**

संपूर्ण देशाचे लक्ष मंगळवारी बारामती लोकसभा मतदार संघाकडे लागले होते. बारामती लोकसभा निवडणुकीचे मतदान सुरु असताना आरोप-प्रत्यारोप सुरु होते. यंदा बारामती मतदार संघात कमी मतदान झाले. परंतु मतदान संपल्यावर धक्कादायक घटना घडली आहे. बारामती लोकसभा मतदार संघात येणाऱ्या वारजे माळवाडी भागात गोळीबार झाला. या भागातील रामनगरमध्ये दुचाकीवरून आलेल्या दोघांनी हवेत गोळीबार केल्याची घटना रात्री १०.३० वाजता घडली. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला आहे.

**पुण्यात गुन्हेगारी वाढली**

पुणे शहरात गुन्हेगारी वाढली आहे. किरकोळ कारणावरुन कोयता हल्ले झाल्याच्या अनेक घटना यापूर्वी घडल्या. परंतु गेल्या काही महिन्यांपासून गोळीबाराच्या घटना घडत आहेत. यामुळे पुणे शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेसंदर्भात प्रश्न निर्माण झाला आहे. मंगळवारी पुणे शहरातील भाग असलेल्या परंतु बारामती लोकसभा मतदार संघात येणाऱ्या वारजे येथील रामनगरमध्ये दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी हवेत गोळीबार केला. रात्री साडेदहा वाजता घडलेल्या या घटनेमुळे परिसरात दहशत निर्माण झाली. आरोपींनी गोळीबार करुन मुंबई पुणे हायवेवरुन कात्रजच्या दिशेने पळ काढला.

**काय आहे कारण**

आरोपींना गोळीबार का केला? हे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. गोळीबार केलेल्या आरोपींचा वारजे पोलिसांकडून शोध सुरु करण्यात आला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत आहे. परंतु गोळीबाराच्या वाढत्या घटनांमुळे परिसरात दहशत निर्माण झाली आहे.

**मागील महिन्यात तीन वेळा गोळीबार**

» पुणे शहरात मागील महिन्यात तीन वेळा गोळीबार झाला होता. जंगली महाराज रोडवर बांधकाम व्यावसायिक धीरज दिनेशचंद्र आरगडे यांच्यावर गोळीबाराचा प्रयत्न झाला. त्याचा तपास पोलिसांनी लावला. त्यानंतर हडपसरमध्येही दोन सैनिकांमध्ये वाद झाला होता. त्यातून भर रस्त्यात गोळीबार करण्यात आला होता. त्यात एक जखमी झाला होता. त्यानंतर पुणे शहरातील सिंहगड रोड परिसरात असलेल्या भुमकर चौकात गोळीबार झाला होता. कडीपेटी मागितल्याच्या कारणातून गणेश गायकवाड यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता.

# महापालिका आणखी दोन इंग्रजी शाळा सुरु करणार

## सध्याच्या दोन इंग्रजी शाळांत 1100 विद्यार्थी घेताहेत शिक्षण : पालकांचा चांगला प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या चिंचवड दळवीनगर आणि भोसरी या ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू आहेत. या शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी पालकांचा प्रतिसाद चांगला आहे. त्यामुळे शहरात आणखी दोन शाळा इंग्रजी माध्यमाच्या करण्याचा निर्णय महापालिकेच्या शिक्षण विभागाने घेतला आहे.



महापालिकेच्या शिक्षण मंडळाने २०१५ मध्ये खासगी संस्थांच्या मदतीने बोपखेल आणि मोशी येथे इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली. मात्र, पुढे त्याला यश आले नाही. नंतर महापालिकेने भोसरी व चिंचवड येथील दळवीनगरमध्ये इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली आहे. अवघ्या ६४ विद्यार्थी संख्येवर सुरू झालेल्या या शाळेमध्ये आता ११०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश न घेता अनेक पालक महापालिकेच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी उत्सुक आहेत. पालकांचा चांगला प्रतिसाद असताना जागा कमी असल्याने अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश देता येत नाही.

त्यामुळे आणखी दोन ठिकाणी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यासाठी कोणती शाळा निवडायची याबाबत विचार सुरू आहे. जून महिन्यापासून आणखी दोन शाळा इंग्रजी माध्यमाच्या केल्या जाणार आहेत.

> इंग्रजी शाळेत प्रवेश घेण्याकडे पालकांचा कल आहे. त्यासाठी त्यांना शाळा उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. शहरातील दोन शाळांमध्ये इंग्रजी माध्यम सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी कोणत्या शाळा निवडायच्या याबाबत आयुक्त निर्णय घेणार आहेत. मात्र, त्यासाठी कार्यवाही सुरू झाली आहे.
>
> **- विजयकुमार थोरात, सहायक आयुक्त, शिक्षण विभाग.**

# प्रचारासाठी श्रीरंग बारणे पोचले आदिवासी वाड्या-वस्त्यांपर्यंत

## 'माझा भाव आला', म्हणत आदिवासी भगिनींनी केले बारणेंचे स्वागत : प्रचार दौऱ्यात बारणेंना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील प्रचार दौऱ्यात मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे-आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी कर्जत शहरापासून अगदी दुर्गम भागातील आदिवासी वाड्या-वस्त्यांपर्यंत मतदारांशी संपर्क साधला. 'माझा भाव आला' असं म्हणत स्वतःच्या हातांनी बनवलेला रान फुलांचा गुच्छ देत आदिवासी भगिनी त्यांचे स्वागत केले. विकास कामे केल्यामुळे बारणे यांनी आदिवासी बांधवांकडेही हक्काने मागितली.



खासदार बारणे यांनी कर्जत तालुक्यातील पळसदरी, भिसेगाव, चारफाटा, श्रीराम पूल, दहिवली, खांडपे, कोंदिवडे, चोचीवाडी, बीड, मोहिली, धाकटे वेणगाव, जांभिवली, कडाव, कशेळे, पाथरज, खांडस, नांदगाव, बलीवरे, ओलमन, कोळंब, पोशीर, नेरळ, डिकसळ, किरवली आदी गावांचा प्रचार दौरा केला.

कर्जतच्या प्रचार दौऱ्यात बारणे यांच्या समवेत आमदार महेंद्र थोरवे, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख शिल्पाताई देशमुख, तालुका प्रमुख संभाजी जगताप, मनोहर थोरवे, भाजपचे प्रचार प्रमुख किरण ठाकरे, तालुकाध्यक्ष राजेश भगत, सरचिटणीस दीपक बेहरे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, कर्जत शहराध्यक्ष भगवान भोईर, रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे तालुकाध्यक्ष हिरामण गायकवाड आदी पदाधिकारी होते.

बारणे यांनी कर्जत तालुक्यातील आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहेत. अत्यंत दुर्गम अशा आदिवासी पाड्यांपर्यंत रस्ते, विकास वीज, पाणी अशा मूलभूत सुविधा पोहोचविण्याचे काम केले आहे. या भागात त्यांचे तेवढ्याच प्रेमाने स्वागत होताना दिसत होते.

### हापूस आंब्यांचा हार घालून स्वागत

श्रीरंग आप्पांचे ठिकाणी प्रेमाने स्वागत होत होते. एका गावात तर त्यांच्या चाहत्यांनी त्यांना कोकणच्या हापूस आंब्यांचा हार घातला.

तालुक्यात दिवसभर प्रचार दौरा केल्यानंतर कर्जत शहरात महायुतीच्या वतीने भव्य प्रचार फेरी काढण्यात आली. या प्रचार फेरीच्या निमित्ताने महायुतीने जोरदार शक्तीप्रदर्शन केले. तरुण कार्यकर्ते दुचाकीवर महायुतीतील घटक पक्षांचे झेंडे घेऊन रॅलीत सहभागी झाले होते. खासदार बारणे यांनी रॅली मार्गाच्या दुतर्फा उभ्या असलेल्या मतदारांना अभिवादन करून धनुष्यबाणाला मतदान करण्याचे आवाहन केले.

### 'माझा भाव आला, माझा भाव आला'

» ओलमन या गावात 'माझा भाव आला, माझा भाव आला', असे म्हणत आदिवासी भगिनींनी मोठ्या आपुलकीने आप्पांचे स्वागत केले. स्वतःच्या हातांनी बनवलेला रानफुलांचा गुच्छ देत प्रेमाने ओवाळले. या स्वागताने आप्पा भारावून गेले. 'मी पण तेवढ्याच हक्कानं मतं मागायला आलो आहे,' असे म्हणत आप्पांनी त्यांना मतदानाचे आवाहन केले.

# झोपडीधारकांना मिळणार हक्काचे घर

## झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी 70 टक्के ऐवजी 51 टक्के झोपडीधारकांची संमती : मुरलीधर मोहोळ

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी ७० टक्के ऐवजी ५१ टक्के झोपडीधारकांची संमती, तीनशे चौरस फुटांचे घर, प्रकल्पासाठी वेळेचे बंधन अशा अनेक गोष्टी राज्यातील महायुती सरकारने नवीन नियमावलीत केल्याने या प्रकल्पांना गती देता येईल आणि झोपडीधारकांना हक्काचे घर मिळेल, असा विश्वास पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला.



पाषाण, सोमेश्वरवाडी, बाणेर, बालेवाडी परिसरात मोहोळ यांच्या प्रचारफेरीचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, सचिन दळवी, प्रकाश बालवडकर, राहुल कोकाटे, अनिकेत मुरकुटे, सुहास निम्हण, विशाल विधाते, राहुल बालवडकर, प्रविण शिंदे, संग्राम मुरकुटे, सुभाष भोर यांनी सहभाग घेतला.

मोहोळ म्हणाले, पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये ५५७ झोपडपट्ट्या असून त्यापैकी २८६ घोषित झोपडपट्ट्या आहेत. अघोषित झोपडपट्ट्यांची संख्या २७१ इतकी आहे. एकूण २ लाख २६१ झोपडपट्टीतील घरे असून १२ लाख रहिवासी वास्तव्य करतात.

मोहोळ पुढे म्हणाले, सध्याच्या जागेवरील झोपडपट्टी पुनर्वसन करताना आहे त्याच जागेवर किंवा त्या जागेपासून दोन किलोमीटर परिसरात स्थलांतर करून पुनर्वसन करण्याची तरतूद नियमावलीत होती. सुधारित नियमावलीत दोनऐवजी पाच किलोमीटरच्या परिघात पुनर्वसन करण्यास मान्यता दिली आहे. या प्रकल्पांना प्रोत्साहन मिळावे यासाठी वाढीव चटई निर्देशांक व अन्य सवलती दिल्या जाणार आहेत. सरकारी जागांवरील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन एसआरए करणार आहे. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळेल असा विश्वास वाटतो.

**मोहोळ यांच्या प्रभावी यंत्रणेचा नागरिकांना फायदा..**

मतदानासाठी नागरिकांच्या 'उत्साहा'बाबत सातत्याने चर्चा होत असतानाच महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या संपर्क कार्यालयातून आजपर्यंत दोन लाख मतदारांनी व्होटिंग स्लिप प्राप्त केल्याची माहिती समोर येते आहे. मोहोळ यांची उमेदवारी सर्वात आधी जाहीर झाल्याने योग्य वेळी प्रचारयंत्रणा कार्यान्वित करता आली, असे प्रचार समन्वयक निलेश कोंढाळकर यांनी सांगितले.

### कोथरूडमधील 38 हजार मतदारांची नावे वगळली

» व्होटिंग स्लिपसाठी मुरलीधर मोहोळ यांच्या कार्यालयात संपर्क साधणाऱ्या अनेक नागरिकांना आपले नाव मतदारयादीत नसल्याचे लक्षात येत आहे. गेल्यावेळेस मतदान केलेल्या कोथरूडमधील सुमारे ३८ हजार मतदारांची नावे यावेळेस वगळण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. निवडणूक आयोगाने यादीतील नाव, छायाचित्र, पत्ता आदीसंदर्भात सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी केलेल्या आवाहनांकडे नागरिकांचे दुर्लक्ष झाल्याने त्यांना मतदानाचा हक्क गमवावा लागत आहे, अशी हळहळ राजकीय वर्तुळातून व्यक्त होते आहे. याविषयी निवडणूक आयोगाने एक संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नगर रस्त्याची लवकरच कोंडीमुक्ती!

## शास्त्रीनगर चौकातील फ्लायओव्हर, 'ग्रेड सेपरेटर' ला पुरातत्त्व विभागाचा ग्रीन सिग्नल, पुलाचे काम झाल्यावर होणार कोंडीतून सुटका

**पुणे | प्रतिनिधी**

येरवड्यातील शास्त्रीनगर येथील उड्डाणपूल, ग्रेडसेपरेटरच्या कामासाठी केंद्र, राज्य सरकारच्या पुरातत्त्व विभागाने महापालिकेला ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे रखडलेल्या पुलाच्या कामाचा मार्ग मोकळा झाला आहे. या पुलाचे काम झाल्यानंतर नगर रोडवरील मोठ्या वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका होणार आहे.




नगर रस्त्यावर प्रामुख्याने येरवडा ते वाघोली दरम्यान वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर आहे. ही कोंडी सोडविण्यासाठी शास्त्रीनगर, खराडी बायपास येथे उड्डाणपूल, ग्रेड सेपरेटरसाठी महापालिकेच्या अंदाजपत्रकात निधीची तरतूद करण्यात आली होती. त्यात नगर रस्त्यावरील दुमजली उड्डाणपूल थेट विमानगरपर्यंत आणण्यात यश आल्याने खराडातील उड्डाणपुलाचा प्रश्न मार्गी लागला.

मात्र, शास्त्रीनगरजवळ असलेल्या आगाखान पॅलेस हे राष्ट्रीय स्मारक असल्याने येथील उड्डाणपुलाच्या कामासाठी आवश्यक असलेले पुरातत्त्व विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) बंधनकारक ठरले होती. ही 'एनओसी' मिळत नसल्याने पुलाचे काम रखडले होते. या संदर्भात वडगाव शेरी मतदारसंघाचे आमदार टिंगरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार केंद्र, राज्य सरकारची एनओसी मिळाली आहे. २ मे रोजी याबाबत ना हरकत प्रमाणपत्र महापालिकेला मिळाले आहे. त्यामुळे आता लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर प्रत्यक्ष या कामाला सुरुवात होईल.

> नगर रोड परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी गेल्या साडेचार वर्षांपासून पाठपुरावा करत आहे. नगर रस्त्यावर शिरूर ते वाघोलीपर्यंत होणारा दुमजली उड्डाणपूल रामवाडीपर्यंत आणण्यात यश आले आहे. तसेच येरवडा ते विमानगरपर्यंतची बीआरटी काढल्याने वाहतूक कोंडी सुटली आहे. आता पुरातत्त्व विभागाची एनओसी मिळाल्याने शास्त्रीनगर येथील उड्डाणपूल, ग्रेडसेप्रेटरच्या कामाचा मार्ग मोकळा झाला आहे. ही कामे पूर्ण झाल्यावर निश्चितपणे नगर रस्ता कोंडीमुक्त आणि सिग्नल मुक्त होईल.
>
> **- सुनील टिंगरे, आमदार, वडगाव शेरी मतदारसंघ.**